# - प्रेस नोट -

दि. १४/०६/२०२६

## मानखुर्द पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. १३/०६/२०२६ रोजी ११.०० वा. च्या सुमारास फिर्यादी गुलाम कादिर राऊफ खान वय-३७ वर्षे, धंदा -रिक्षाचालक, रा. ठी. मानखुर्द, मुंबई हे रिक्षा चालवुन घरी येवुन जनता नगर, नुरी मस्जिद, मंडाळा, मानखुर्द, मुंबई येथे रिक्षा पार्क करीत असताना फिर्यादीच्या परीसरात राहणारा व परीचयाचा अटक आरोपी - पुरुष, २८ वर्षे याने फिर्यादीला बोलावुन येथे रिक्षा पार्क करायची असल्यास हप्ता देण्यास सांगितले तसेच जबरदस्तीने शिवीगाळ व धक्काबुक्की करून फिर्यादीच्या शर्टच्या खिशातील रिक्षा चालवुन मिळवलेले रू. ३५००/- जबरदस्तीने काढुन घेतले. सदरचे पैसे फिर्यादीच्या मेहनतीचे असल्याने ते फिर्यादीने परत मागितले असता अटक आरोपीने फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी दिली व अटक आरोपीने त्याच्या खिशातुन दाढी करण्याचा वस्तारा काढुन त्याने फिर्यादीच्या गळयावर वार केला परंतु फिर्यादीने तो वार चुकवला असता त्याने फिर्यादीला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या छातीवर डाव्या बाजुस वार करून फिर्यादीला गंभीर जखमी केले. त्या वेळी तेथे फिर्यादीच्या ओळखीचा सलमान रहिम खान हा फिर्यादीला वाचविण्याकरीता आला असता अटक आरोपीने त्याच्याकडील वस्ताऱ्याने सलमानच्या छातीवरही वार करून त्यालाही जखमी केले. सदर वेळी फिर्यादीचा आरडाओरडा ऐकुन तेथे लोक जमा झाले असता तेथे जमा झालेल्या लोकांना अटक आरोपीने ने हातातील वस्तारा त्यांच्या दिशेने दाखवुन जीवे मारण्याची धमकी दिली व त्यांच्या अंगावर धावुन गेल्याने सर्व लोक तेथुन पळुन गेले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.१३/०६/२०२६ रोजी गु.र.क्र.३५९/२६,कलम १०९,३११,३५२,३५१(३) बीएनएस २०२३, सह कलम ३७(१)(अ) मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

--------------------